जाहीर नोटीस (१)

संबंधितांना या नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टामध्ये नमूद केलेले सर्व पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मंजूर योजनेतील आरक्षणाने/रस्त्याने बाधीत क्षेत्र पिंपरी चिंचवड महानगरपालिका सदर मिळकतीच्या हितसंबंधीतांकडून हस्तांतरणीय विकास हक्काच्या ( टि.डी. आर) बदल्यात ताब्यात घेत आहे. सदरील मिळकत निर्वेध व निजोखीम असल्याचा भरवसा सदर मिळकतीच्या हितसंबंधीतांनी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेस दिला आहे.

खालील नमूद मिळकतीवर खालीलप्रमाणे जमीन मालकांशिवाय अन्य कोणाचाही अन्न, वस्त्र, गहाण, दान, बक्षीस, खरेदी, पोटगी,लीज लीन, चार्ज, इजमेंट अथवा कोणत्याही प्रकारचा हक्क वा हितसंबंध असल्यास संबंधितांने प्रस्तुतची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसाच्या आत उपसंचालक, नगररचना, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी पुणे ४११०१८ यांच्या कार्यालयात कार्यालयीन दिवशी व वेळेत येऊन मुळ कागदपत्रांसह आपली हरकत लेखी स्वरूपात द्यावी. सदर मुदतीत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत न आल्यास खालील मिळकतीवर कोणाचाही, कसलाही हक्क वा हितसंबंध नाही असे समजून किंवा असल्यास संबंधीताने तो जाणूनबुजून सोडून दिला आहे. असे समजून पिंपरी चिंचवड महानगरपालिका जमिन ताब्यात घेईल व सदर जमिनीचा मोबदला टि डी आर च्या स्वरूपात खालील जमीनमालकास अदा केला जाईल. त्यानंतर येणा-या कोणत्याही तक्रारींची दखल घेतली जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

परिशिष्ट १)- मिळकतीचे वर्णन - तुकडी पुणे , पोट तुकडी मुळशी, येथील तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील मौजे पुनावळे येथील स.नं. ३५/१/३ पैकी मधील श्री. **अरविंद यशवंत चौधरी** यांचे तर्फे श्री. **विजय भगवंत गायकवाड** व श्री. **पांडुरंग जयवंत गायकवाड** यांचे मिळकतीमधील पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाचे तथापी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या नियोजन नियंत्रणाखाली आलेल्या क्षेत्रातील मंजूर विकास योजनेतील **१८.०० मी. रस्त्याने बाधित क्षेत्र** ९१.३५ **चौ. मी.** जमीन त्यास चतु:सिमा खालील प्रमाणे

चतु:सिमा : -

पुर्व - स.नं. ३५ पै.

पश्चिम - स.नं.३५ पैकी

उत्तर - रस्ता

दक्षिण - स.नं.३५ पैकी अर्जदाराची उर्वरित मिळकत.

परिशिष्ट २)- मिळकतीचे वर्णन - तुकडी पुणे , पोट तुकडी मुळशी, येथील तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील मौजे किवळे येथील स.नं. ७८/१ ते ५/१० पैकी मधील मे. गोबिंद बिल्डर्स अन्ड डेव्हलपर्स तर्फे भागीदार श्री. प्रदीप लालचंद आगरवाल व श्री. राजकुमार झुमरोमल जसतानी यांच्या मिळकतीमधील पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वाढीव क्षेत्र मंजूर विकास योजनेतील विकास योजनेतील **१२.०० मी. रूंद सर्व्हीस रोड या प्रस्तावाने बाधित होणारे** २५३.२६ **चौ. मी.** जमीन त्यास चतु:सिमा खालील प्रमाणे

चतु:सिमा : -

उत्तरेस:- स. नं.७८ पैकीची अर्जदाराची उर्वरित मिळकत
पुर्वेस :- लागू रस्ता
दक्षिणेस :- स. नं.७८ पैकीची मिळकत
पश्चिमेस :- स. नं.७८ पैकीची मिळकत

जाहीर नोटीस (२)

सर्व संबधीतांना या नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टामध्ये नमुद केलेले सर्व पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मंजूर योजनेतील आरक्षणाने/रस्त्याने बाधित क्षेत्र पिंपरी चिंचवड महानगरपालिका सदर मिळकतीच्या हितसंबंधीतांकडून विकास हक्काच्या (डी.आर.) बदल्यात ताब्यात घेत आहे. सदरील मिळकत निर्वेध व निजोखीम असल्याचा भरवसा सदर मिळकतीच्या हितसंबंधीतांनी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेस दिला आहे.

उपरोक्त नमुद मिळकतीवर खालीलप्रमाणे जमीन मालकांशिवाय अन्य कोणाचाही अन्न, वस्त्र , गहाण, दान, बक्षीस, खरेदी, पोटगी ,लीज, लीन, चार्ज , इजमेंट अथवा कोणत्याही प्रकारचा हक्क वा हितसंबध असल्यास संबधितांने प्रस्तुतची नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसांच्या आत उपसंचालक नगररचना पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी पुणे - ४११०१८ यांच्या कार्यालयात कार्यालयीन वेळेत येऊन मुळ कागदपत्रांसह आपली हरकत लेखी स्वरुपात दयावी सदर मुदतीत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत न आल्यास वरील मिळकतीवर कोणाचाही, कसलाही हक्क वा हितसंबध नाही असे समजून किंवा असल्यास संबधितांने तो जाणूनबुजून सोडून दिला आहे, असे समजून पिंपरी चिंचवड महानगरपालिका जमीन ताब्यात घेईल व सदर जमीनीचा मोबदला डी.आर. च्या स्वरुपात खालील जमीनमालकास अदा केला जाईल. त्यानंतर येणा-या कोणत्याही तक्रारीची दखल घेतली जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

परिशिष्ट – १) मिळकतीचे वर्णन - तुकडी पुणे , पोट तुकडी मुळशी , येथील तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील **मौजे ताथवडे** येथील स.नं. ६२/४/२ पैकी **मधील श्री. प्रकाश देवराम गोफणे व इतर यांचे तर्फे कुलमुखत्यारधारक** मे. मॅनशन क्रिएटर्सचे भागीदार श्री. गणेश बाळासाहेब फेंगसे यांचे मिळकती मधील पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मंजूर विकास योजनेतील २४.०० मी. रस्ते व रस्त्याची गोलाईने **बाधित क्षेत्र ४०० चौ.मी.** जमीन त्यास चतु:सिमा खालील प्रमाणे

चतु:सिमा : -

पुर्व - स.नं. ६२ पैकी अर्जदाराची उर्वरित मिळकत.

पश्चिम - लागु रस्ता

उत्तर - स.नं. ६२ पैकीची मिळकत

दक्षिण - लागु जागेवरील रस्ता

परिशिष्ट २) मिळकतीचे वर्णन - तुकडी पुणे , पोट तुकडी हवेली , येथील तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील मौजे पुनावळे येथील सि.स.नं. ४६४,४६५,४६८ मधील लक्ष्मण एकनाथ मोहीते यांचे तर्फे कु.मु.धा. म्हणून व स्वत: करिता श्री. प्रदिप बाबुराव टकले यांचे मिळकतीमधील पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वाढीव हद्दीचे मंजूर विकास योजनेतील **१८.०० मी. रस्त्याने बाधित** क्षेत्र अनुक्रमे १.१२ चौ.मी. १२.५० चौ.मी. व ४३.४८ चौ.मी. असे एकुण ५७.१० चौ.मी. क्षेत्राची जमीन त्यास चतु:सिमा खालील प्रमाणे–

चतु:सिमा

मौजे पुनावळे येथील सि.स.नं. ४६४,४६५,४६८ मधील १८.०० रस्त्याची चतु:सिमा (बाधित क्षेत्र – ५८.२३ चौ.मी.)

पुर्वेस- लागू रस्ता

पश्चिमेस- सि.स.नं. ४६४,४६५, व ४६८ पैकी अर्जदाराची उर्वरित मिळकत

दक्षिणेस- सि.स.नं. ४६९ पैकीची मिळकत.

उत्तरेस - सि.स.नं. ४६४ पैकीची मिळकत.

(राजेंद्र पवार)
उपसंचालक,
नगररचना व विकास विभाग
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी, पुणे ४११०१८

जाहिरात क्र. ९६०
दि.१९/१२/२०२२

सदरची जाहीर नोटीस पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या www.pcmcindia.gov.in या वेबसाईटवर प्रसिद्ध करण्यात आलेली आहे